www.rajdand.com
सातारा, शुक्रवार
10.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.५
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात दिव्यांग व विशेष मुलांसोबत वाढदिवस केला साजरा

पान ४ वर..

# अदानी समूहाला मोठा झटका, जगातील मोठ्या स्टॉक गुंतवणूक कंपनीने विकले सगळे शेअर्स!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**मागील काही दिवसांपासून अनेक प्रश्नांनी घेरलेल्या अदानी समूहाला आणखी एक धक्का बसला आहे. जगातील सर्वात मोठी स्टॉक गुंतवणूकदार नॉर्वे वेल्थ फंडने अदानी समूहातील विविध कंपन्यांचे सारे इक्विटी शेअर्स विक्री केले आहेत. आता, या वेल्थ फंडची अदानी समूहातील कंपनीमध्ये कोणतीही गुंतवणूक नाही. नॉर्वेच्या या वेल्थ फंडने अदानी समूहातील तीन कंपन्यांमध्ये जवळपास २०० दशलक्ष डॉलरची गुंतवणूक केली होती.**

'रॉयटर्स'च्या वृत्तानुसार, २०२२ च्या अखेरीस, अदानी समूहाच्या कंपन्यांमधील नॉर्वे वेल्थ फंडाची इक्विटी गुंतवणूक पुढील प्रमाणे होती. अदानी टोटल गॅस : ८३.६ दशलक्ष डॉलर, अदानी पोर्ट्स ॲण्ड स्पेशल इकॉनॉमिक झोन : ६३.४ दशलक्ष डॉलर, अदानी ग्रीन एनर्जी : ५२.७ दशलक्ष डॉलर.




नॉर्वे वेल्थ फंडचे एडव्हाईस रिस्क मॉनिटरिंग हेड ख्रिस्टोफर राइट यांनी एका पत्रकार परिषदेत म्हटले की, मागील वर्ष संपल्यानंतर आम्ही अदानी समूहातील कंपन्यांमधील गुंतवणूक कमी करत होतो आणि आता या कंपन्यांमध्ये आमची कोणतीही गुंतवणूक नाही. त्यांनी पुढे सांगितले की, आमच्याकडून अदानी समूहाच्या कंपन्यांवर एडव्हाईस शी निगडीत मुद्यांवर मागील काही वर्षापासून देखरेख करण्यात येत होती. ESG म्हणजे, पर्यावरण, सामाजिक आणि शासन संबंधित मुद्यांच्या समावेश आहे.

नॉर्वे वेल्थ फंड जगभरातील ९२०० कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करते. जगातील शेअर बाजारात सूचीबद्ध असलेल्या कंपन्यांमध्ये १.३ टक्के शेअर्स आहेत. हा फंड नॉर्वे सरकारशी संबंधित असून केंद्रीय बँकेकडून याचे व्यवस्थापन केले जाते.

**अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर दरात घसरण**

अमेरिकन रिसर्च फर्म हिंडेनबर्गने प्रसिद्ध केलेल्या अहवालानंतर, अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर दरात मोठी घसरण सुरू झाली. त्यानंतर अदानी एंटरप्रायझेस आणि अदानी पोर्ट्स ॲण्ड स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या शेअर दरात काही दिवस तेजी दिसून आली होती. मात्र, आज गुरुवारी (९ फेब्रुवारी २०२३) अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर दरात घसरण दिसून आली. आज, अदानी टोटल गॅस तिमाही कंपनीचे तिमाही निकाल जाहीर झाले. तिमाही निकाल चांगले असूनदेखील एनएसईवर कंपनीच्या शेअर दरात ५ टक्क्यांची घसरण दिसून आली.

अदानी एंटरप्रायझेसच्या शेअर दरात मोठी घसरण दिसून आली. आज, या कंपनीचा शेअर दर १०.७२ टक्क्यांच्या घसरणीसह १९२७.३० रुपयांवर स्थिरावला. कंपनीचा मार्केट कॅप आता २,१९,७१२.४२ रुपये इतका झाला आहे. अदानी पोर्ट्सच्या शेअर दरात २.९० टक्क्यांची घसरण नोंदवण्यात आली. या कंपनीचा शेअर दर ५८२.०५ रुपयांवर स्थिरावला. अदानी पॉवरच्या शेअर दरात आज लोअर सर्किट लागला. अदानी पॉवरचा शेअर दर १७२.९० रुपयांवर स्थिरावला. अदानी ट्रान्समिशनमध्येही लोअर सर्किट लागला. या कंपनीचा शेअर पाच टक्क्यांच्या घसरणीसह १२४८.५५ रुपयांवर स्थिरावला.

# सोलापूर झेडपीच्या माजी सीईओ विरोधातील खटला रद्द

**सोलापूर : प्रतिनिधी**

सन २०१६ मध्ये सोलापुर जिल्हा परिषद येथे सीईओ म्हणुन कार्यरत असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण किशोर डोंगरे यांचेविरुद्ध माढा येथील कोर्टात दाखल झालेला खटला हा त्यास शासनाची पूर्वमंजुरी नसल्याने तो बार्शी येथील अतिरिक्तसत्र न्यायाधिश जगदाळे यांनी रद्दबातल करण्याचा आदेश पारित केला.

याची थोडक्यात हकीकत अशी, सन २०१६ मध्ये टेंभुर्णी ग्रामपंचायत ग्रामसचिवालय मधील तळमजल्यातील आर. सी. सी. बांधकाम असलेला एक हॉल, टेंभुर्णी येथीलच विठ्ठल मध्यवर्ती ग्राहक भांडार यांना करारावर भाड्याने दिला होता. सदरच्या करारामध्ये अनियमितता झाली व त्याअनुषंगाने टेंभुर्णी येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे नुकसान झाले अशा प्रकारची खाजगी फिर्याद टेंभुर्णी येथील रहिवाशी बी. बी. जहागीरदार यांनी माढा येथील फौजदारी न्यायालयात खाजगी फिर्यादीद्वारे केलेली होती. त्यावर माढा न्यायालयाने पोलीस चौकशीचा आदेश करून टेंभुर्णी पोलीसांचा अहवाल मागविला होता. त्याप्रमाणे टेंभुर्णी पोलीसांनी २०१८ साली अहवाल पाठविला होता. सदर फिर्यादीची तक्रारीचा विचार करून न्यायालयाने टेभुर्णी ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच, जि.प. चे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, विठ्ठल मध्यवर्ती ग्राहक भांडाराचे सचिव व इतर दोघेजण अशा एकूण ७ जणांविरुद्ध फौजदारी खटला सुरु करून वरील व्यक्तींना माढा येथील कोर्टात आरोपी म्हणून खटल्यास सामोरे जाण्यासाठी हजर राहणेचा आदेश पारित केला होता.

सदर आदेशास तत्कालीन सीईओ अरुण डोंगरे यांनी बार्शी येथील सत्र न्यायालयात ॲड. शशि कुलकर्णी यांच्यामार्फत पुर्ननिरिक्षण याचीका दाखल करून, त्यास आव्हान दिले होते. त्यामध्ये त्यांचेविरुध्दचा माढा न्यायालयातील खटला रद्द होणेची मागणी त्यांनी केली होती. त्याप्रमाणे सत्र न्यायालयासमोर अंतिम सुनावणी होवून त्यामध्ये तत्कालीन सीईओ यांचे वकिलांनी असे मुद्दे मांडले की, प्रकरणातील खटल्यात सीईओ हे लोकसेवक असल्याने त्यांचे विरुद्ध खटल्यास क्रि.प्रो.को. कलम १९७ प्रमाणे शासनाची पूर्व मंजुरी गरजेची आहे ती फिर्यादीने घेतली नाही, तसेच सीईओ यांचेविरुद्ध कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही. सदरचा युक्तीवाद व प्रकरणातील कागदपत्रे पाहुन खटल्यास पुर्वमंजुरी नाही या मुख्य मुद्यावर बार्शी येथील सत्र न्यायालयाने सनदी अधिकारी अरुण डोंगरे यांचे विरुद्ध माढा येथील चालु झालेला वर नमुद फौजदारी खटला रद्दबातल केला.

# प्रस्तावित नागपूर-गोवा द्रुतगती महामार्ग अक्कलकोट तालुक्यातून जाणार

**अक्कलकोट : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शक्तीपिठांना जोडणारा नागपूर-गोवा हा द्रुतगती महामार्ग प्रस्तावित असून हा मार्ग अक्कलकोट तालुक्यातून जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रस्तावित केलेला हा महामार्ग राज्यातील १३ हून अधिक जिल्ह्यातून जाणार आहे. माहूर, औंढा नागनाथ, अंबाजोगाई, परळी, तुळजापूर, अक्कलकोट, पंढरपूर, नरसोबाची वाडी, कोल्हापूर या प्रमुख धार्मिक स्थळांना तो जोडला जाणार आहे. हा प्रस्तावित एक्सप्रेस वे श्रीक्षेत्र माहूरगड येथून जाणार्या राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१-अ ला जोडला जोडणार आहे.

देशातील तीर्थक्षेत्र ते तीर्थक्षेत्राला जोडणार्या या महत्त्वकांक्षी केंद्राच्या कामाला आता वेग आला असून दळणवळणाची साधने वाढत असल्याने तीर्थाटनातून पर्यटन ही संकल्पना या रस्त्यांच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याने राज्यासह परराज्यातील भक्तांचे सुलभरित्या पोहोचून दर्शन व तीर्थक्षेत्रातील विविध प्रेक्षणीय स्थळांची पाहणी करता येणार आहे. यामुळे भक्तांतून समाधान व्यक्त होत आहे.

या महामार्गाच्या जमिन संपादनासाठी सल्लागार समितीची स्थापना झाली आहे. त्यांच्या माध्यमातून भूसंपादन होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. भारतातील प्रमुख राष्ट्रीय महामार्ग असलेल्या कन्याकुमारी ते कश्मिर क्र.४४ या मार्गाला जोडला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज वाढत असलेली गर्दी पाहता अशा नवनवीन योजना राबविणे काळाची गरज आहे.

सध्या श्रीक्षेत्र अक्कलकोट ते सोलापूर, अक्कलकोट ते गाणगापूरचे काम अंतिम टप्प्यात, सुरत-चेन्नई हा राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन, प्रस्तावित तेरामैल-तडवळ-पानमंगरुळ-करजगी-जेऊर-श्रीक्षेत्र अक्कलकोट ते शिरवळ-वागदरी-आलुर-उमरगा-चौक रस्ता मार्गे मराठवाड्यातून विदर्भ, खान्देश, मध्य प्रदेश व हैद्राबाद, विशाखापट्टणम्, काकीनाडा, मछलीपट्टणम, चेन्नई, कोलकत्ता यांना जोडणार आहे. यासह कर्नाटक सीमाभागून आणखीन एक रस्ता प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले आहे.

# ठाकरे गटाचा पाठींबा काँग्रेसला की संभाजी ब्रिगेडला?

## स्वत:चा उमेदवार नसताना उद्धव ठाकरे यांना पेच

**पुणे : प्रतिनिधी**

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने उमेदवार उभा केला आहे. तसेच शिवसेना ठाकरे गटाशी युती असलेल्या संभाजी ब्रिगेडने ही आपला उमेदवार उभा केला आहे. त्यामुळे ठाकरे गट नेमका कोणाच्या पाठीशी हा संभ्रम निर्माण झाला आहे.



दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनाने रिक्त झालेल्या कसबा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. महाविकास आघाडीने ही जागा काँग्रेससाठी सोडली आहे. काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी देऊन प्रचारही सुरू केला आहे.

त्याचवेळी संभाजी ब्रिगेडने अविनाश मोहिते यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. शिवसेना आणि संभाजी ब्रिगेड यांचीही युती आहे. मग या निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून शिवसेना ठाकरे गट धंगेकरांना पाठिंबा देणार की युतीतील सहयोगी पक्ष म्हणून संभाजी ब्रिगेडच्या मोहिते यांच्या पाठीशी बळ उभे करणार, असा संभ्रम आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हा पेच सोडवून शिवसैनिक आणि मतदार यांना स्पष्ट निर्देश देण्याची आवश्यकता आहे.

# विरोधकांवर जीवघेणे हल्ले करण्याचा सरकारचा कट

■ शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठवाड्यात माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या सभेत झालेली दगडफेक किंवा महिला आमदारांवर झालेला हल्ला यावरून सरकार आणि गृहमंत्री निष्क्रिय असल्याचे दिसून येत आहे. विरोधकांवर जीवघेणे हल्ले घडवून आणण्याचा सरकारचा कट असल्याचेच यावरून दिसून येत आहे, असा आरोप शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी केला.



उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. त्यांनी त्यांचा यापूर्वीचा कार्यकाळ आणि आताची त्यांची कार्यक्षमता याची तुलना करून बघावी, असेही राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

राज्यात कायदा सुव्यवस्था स्थिती ढासळलेली आहे. शिंदे फडणवीस सरकार आणि गृह विभाग निष्क्रिय बनला आहे. गरज नसताना अनेक जण पोलिसांचा पाऊस फाटा घेऊन फिरत आहेत आणि विरोधी पक्षाच्या महत्त्वाच्या नेत्यांची सुरक्षा काढून घेण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्यावर सर्रास हल्ले होत आहेत. कदाचित सरकारला हेच अपेक्षित असावे, अशी शंका राऊत यांनी व्यक्त केली. राज्यात सरकारचे अस्तित्वच दिसत नसल्याची टीकाही त्यांनी केली.

## सीईओ स्वामी पुन्हा जाणार मसुरीला

### झेडपीचा पदभार देणार कोणाकडे?

**सोलापूर : प्रतिनिधी**

झेडपीचे सीईओ दिलीप स्वामी हे पुन्हा पायाभूत प्रशिक्षणासाठी मसुरीला जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नात पदभार कुणाकडे जाणार? याची चर्चा जिल्हा परिषदेत रंगली आहे.



महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सु.मो. महाडिक यांनी ३ फेब्रुवारी रोजी भारतीय प्रशासन सेवेमध्ये पदोन्नतीने व निवडीने नियुक्त झालेल्या १९ अधिकाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या १२४ व्या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमाला हजर राहण्यासाठी आदेश जारी केले आहेत. मसूरी येथील लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकॅडमी येथे १३ फेब्रुवारी ते २४ मार्च या काळात हे प्रशिक्षण होणार आहे. यासाठी झेडपीचे सीईओ स्वामी यांच्यासह १९ अधिकाऱ्यांना १० फेब्रुवारी रोजी कार्यमुक्त होऊन प्रशिक्षणासाठी हजर होण्यास सूचित केले आहे. गेल्याच महिन्यात सीईओ स्वामी प्रशिक्षणासाठी मसुरीला गेले होते. आता पुन्हा सामान्य प्रशासन विभागाने पायाभूत प्रशिक्षणासाठी त्यांची निवड केली आहे. त्यामुळे त्यांच्या पक्षात पदभार प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे की अतिरिक्त सीईओ संदीप कोहिनकर यांच्याकडे जाणार याबाबत चर्चा रंगली आहे.

# पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांनाही आमच्या शुभेच्छा!

## वाढदिवसानिमित्त आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना अनोखे गिफ्ट

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

आमच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांनाही आमच्या शुभेच्छाच आहेत. आज आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कोणतेही आव्हान देणार नाही, असे सांगत शिवसेना नेते व माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना वाढदिवसानिमित्त अनोखे गिफ्ट दिले.



शिवसंवाद यात्रेच्या दौऱ्यावर असलेले आदित्य ठाकरे यांनी बिडकीन येथे रवाना होण्यापूर्वी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाबद्दल त्यांना विचारणा केली असता आज त्यांना कोणतेही आव्हान देणार नाही, असे ठाकरे यांनी सांगितले.

शिव संवाद यात्रेदरम्यान ठाकरे हे दर दिवशी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करीत आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या विरोधात वरळी येथे निवडणूक लढवावी, असे आव्हान ठाकरे यांनी दिले होते. त्याचप्रमाणे निवडणूक प्रचाराच्या काळात मुख्यमंत्र्यांना गल्लोगल्ली फिरणे भाग पाडू, असेही ते म्हणाले होते.

आम्ही कुणाचेही वाईट चिंतत नाही. कोणी आमच्या पाठीत खंजीर खुपसला असला तरीही आमच्या त्यांना शुभेच्छाच आहेत. ते आमचे संस्कार आहेत, असे ठाकरे म्हणाले.

## आंबेघर विकास सेवा सोसायटीद्वारे ८४ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या

# सचिवाला मेढा न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी

**पाचगणी : प्रतिनिधी**

जावळी तालुक्यातील आंबेघर, भोगवली विकास सेवा सोसायटीच्या सचिवावर फसवणूक प्रकरणी मेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या सचिवाने ८४ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर फसवणूक करणाऱ्या सचिव अजित तुकाराम रांजणे (वय ४१, राहणार दापवडी, तालुका जावली) याला मेढा न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत माहिती अशी, पदाचा गैरवापर करून आंबेघर भोगवली विकास सेवा सोसायटी लिमिटेड आंबेघर, तालुका जावली या संस्थेच्या सभासदांच्या नावावर परस्पर कर्ज उचलून कर्जदारांची दिशाभूल करून चलनाद्वारे कर्जदारांचे पैसे काढून घेऊन काही सभासदांकडून कर्जाच्या वसुलीचे पैसे घेणे, काही सभासदांकडून कर्जाच्या वसुलीचे पैसे बँकेत न भरता स्वतः हडप करणे, कर्जदारांना बँकेचे नसलेल्या वसुलीची चलने देणे तसेच त्यांना कर्ज असताना कर्ज नसल्याचा खोटा दाखला देणे, सभासदांच्या पासबुक व खोट्या नोंदी करणे अशा विविध प्रकारे कर्जदारांची एकूण ८४ लाख ३९ हजार २७९ रुपयांची फसवणूक अजित तुकाराम रांजणे या सचिवाने केली होती.

या प्रकरणावर अनेकवेळा जिल्हा बँकेत त्याचबरोबर मेढा दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये तक्रारी देखील दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याचं काम संबंधित विभागाकडून सुरुवातीला करण्यात आले होते. या प्रकरणावर मोठ्या प्रमाणात आवाज उठवण्यात आल्यानंतर सखोल चौकशी करण्यात आली. या प्रकरणाच्या तपासाला तब्बल दोन वर्ष लागले. दोन वर्षांच्या सखोल चौकशीनंतर संबंधित सचिवाने ८४ लाख रुपयांची फसवणूक केली असल्याचे उघड झाल्यानंतर तक्रारदार याच्या तक्रारीची दखल घेण्यात आली व त्यानंतरच गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र या फसवणुकीत प्रत्यक्ष सचिवाबरोबर आणखीन कोण कोण आहेत, हे अद्यापही पोलीस तपासात समोर आले नाही.

**दरम्यान, करहर बँकेतून हे सर्व व्यवहार झाले असून या बँकेच्या प्रमुख कर्मचाऱ्याला हाताशी धरून संबंधित व्यवहार केले असल्याची चर्चा सध्या जोर धरू लागली आहे. मात्र,बँकेच्या त्या कर्मचाऱ्याला नेमकी क्लीनचीट कोणी दिली, असा सवाल देखील आता उपस्थित केला जाऊ लागला आहे. या सर्व अपहार झाला व अपहार करणारा मास्टरमाईंड नेमका कोण? याचाही शोध घेणे गरजेचे आहे.**

याबाबत मेढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांच्याशी संपर्क साधला असता तपासात अद्यापही ८४ लाखांची फसवणूक करणाऱ्या सचिवाने कोणाचेच नाव सांगितले नाही. मात्र, प्रत्यक्षात संबंधित सचिवाने ८४ लाख रुपयांची फसवणूक करताना त्याला नेमके कोणाकोणाचे पाठबळ होते, या सचिवाला वाचवण्यासाठी कोणी कोणी प्रयत्न केले, त्यांची नावंदेखील आता तपासात प्रत्यक्षरीत्या समोर आली पाहिजेत, अशी मागणी सभासदांनी केली आहे.

हा सर्व प्रकार २०२१-२२ या वर्षात सचिव्याने पदाचा गैरवापर करून केलेला आहे. याप्रकरणी गणेश पोफळे यांनी तक्रार केली होती. मिळालेल्या माहितीनुसार गणेश पोपळे यांच्या तक्रारीवर दुर्लक्ष करण्यात आले होते. मात्र, वारंवार पाठपुरावा केल्यानंतर व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी यावर आवाज उठवल्यानंतर हे प्रकरण गांभीर्याने चौकशीसाठी समोर घेण्यात आले.

# बाळासाहेब दाभेकर यांची रिंगणातून माघार

## बंड शमविण्यात काँग्रेसला यश



**पुणे : प्रतिनिधी**

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीतून बंडखोर बाळासाहेब दाभेकर यांनी माघार घेतली आहे. त्यांच्या निर्णयामुळे काँग्रेसला मोठा दिलासा मिळाला आहे.

या निवडणुकीसाठी काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर यांची उमेदवारी जाहीर झाल्यावर पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष असलेल्या बाळासाहेब दाभेकर यांनी बंडाचा झेंडा उभारला होता. मोठे शक्ती प्रदर्शन करीत त्यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे काँग्रेसच्या गोटात मोठी अस्वस्थता निर्माण झाली.

दाभेकर यांनी आपला अर्ज मागे घ्यावा यासाठी काँग्रेसकडून कसोशीने प्रयत्न करण्यात आले. शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्यासह अनेक नेत्यांनी दाभेकर यांची समजूत घातली. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन दाभेकर यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

# ग्रामसेविकांनी आरोग्याची काळजी घ्यावी - सीईओ दिलीप स्वामी

## महिला सक्षमीकरण व प्रशासकीय सुधारणा कार्यशाळा

**सोलापूर : प्रतिनिधी**

कामाला देव माना. कर्माला महत्त्व द्या. ताणतणावामुळे स्वास्थ्य बिघडते. ग्रामसेविकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

सिंहगड शिक्षण संकुलात जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग व महिला बाल कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने महिला ग्रामसेवकांसाठी महिला सक्षमीकरण व प्रशासकीय सुधारणा कार्यशाळाघेणेत आली.यावेळी सिईओ दिलीप स्वामी बोलत होते. शहा बोलत होत्या. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, ग्राम पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, महिला व बाल कल्याण विभागाचे मोहीम अधिकारी जावेद शेख, गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभा साखरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभांगी तनपुरे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, व्याख्याता सीता पाटील आदी उपस्थित होते.

सिईओ दिलीप स्वामी यांनी महिला ग्रामसेवका यांचे साठी खास या महिला सक्षमीकरण कार्यशीळेचे आयोजन करणेत आले होते. योगा, पोहणे, व्यायाम, ध्यान, पायी चालणे छंद जोपासा, सुर्यनमस्कार विविध व्यायामाचे प्रकार सिईओ स्वामी यांनी सांगितले. मनातलं मैत्रिणींशी बोला. कामाचे व वेळेचे नियोजन करा. वाचायला शिका. भावना व्यक्त करायला शिका. संवाद कौशल्य जोपासा. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले.

**महिलांना दुय्यम स्थान - सुहासिनी शहा**

महिला या कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत अधिक सक्षम आहेत. परंतु समाजव्यवस्थेने त्यांना दुय्यम स्थान दिले आहे. फक्त ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागात सुद्धा महिलांना आजही दुय्यम स्थान दिले जाते. महिलांनी स्वतः मध्ये आत्मविश्वास वाढवावा. स्वतःला कधीही दुय्यम समजू नका. महिलांमध्ये धैर्याची कमी नाही. त्या कोणत्याही परिस्थितीस पुरुषांच्या तुलनेत धैर्याने तोंड देतात. ग्रामसेविकांना ग्रामीण भागात काम करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. प्रशासकीय सुधारणांबरोबरच स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत यावेळी शहा यांनी व्यक्त केले.

**ताणतणाव लक्षात येत नाही - सिईओ स्वामी**

कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असे सांगणारे संत सावता महाराज यांना कामात देव मानला.कामाला महत्व द्या. सकारात्मक रहा, आनंदी रहा असे सांगून सिईओ दिलीप स्वामी म्हणाले, ताणतणाव चे परिणाम लक्षात घ्या. छोटे प्रसंगांतून ताणतणाव निर्माण होतो. प्रेशर कुकर सारखे राहू नका. ताणतणावाचे व्यवस्थापन करा. आरोग्याची काळजी घ्या. महिलांमधील शक्तीची ओळख करून देण्यासाठीच आजच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यामागील उद्देश आहे. आमच्या महिला ग्रामसेविका या ग्रामीण भागात काम करताना त्या आत्मविश्वासाने येणाऱ्या प्रत्येक अडचणींना सामोरे जाव्यात. त्यांच्या प्रशासकीय कामकाजांच्या सुधारणे बरोबरच आरोग्याच्या समस्या जाणून घेवून त्याबाबत त्यांच्यात जागृती निर्माण करणे हाही उद्देश या कार्यशाळेचे आयोजन करण्यामागे आहे.

**ग्रामपंचायत अधिनियमाचा चांगला. अभ्यास करा - अतिरिक्त सिईओ कोहिनकर**

ग्रामपंचायतीच काम सक्षम पणे करणे साठी नियमांचा अभ्यास करा जेणे करून लोकांना वेळेत सेवा देता येतील असे मत अतिरिक्त सिईओ संदीप कोहिनकर यांनी व्यक्त केले. सरपंचाना अपात्र तोटी कारवाई केले नंतर एप्रिल करणे साठी व पडताळणी साठी किती दिवसाचा कालावधी आहे? ग्रामपंचायतीच् नमुना रजिस्टर,सरपंच व उपसरपंच, मासिक सभा व ग्रामसभेचे अधिकार याबाबत उलट प्रसंगी विचारून मार्गदर्शन केले . परिपत्रक व वरिष्ठ कार्यालयाकडून येणारे पत्रव्यवहार याची काळजीने अभ्यास करा. अतिक्रमणाबाबत नियमांची माहिती करून घ्या. कामात यामुळे अडथळे निर्माण होणार नाहीत. असेही अतिरिक्त सिईओ संदीप कोहिनकर यांनी सांगितले.

**अधिकाराची जाणीव ठेवा - शेळकंदे**

इशाधीन शेळकंदे म्हणाले महिला ग्रामसेविकांनी आपले कामकाज करताना महिला सरपंच व सदस्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव व ग्रामपंचायत कामकाजाविषयी महिती देण्याचे काम प्राधान्याने करणे गरजेचे आहे. आपल्या अधिकाराची जाणीव झाल्याशिवाय महिला खऱ्याअर्थाने सक्षम होणार नाहीत.

**आहाराची काळजी घ्या - डॉ. शुभांगी गुंजाळ**

ग्रामसेविका यांनी कामाचा व्याप लक्षात घेता स्वत चा आहार व व्यायाम याची काळजी घ्या. ताणतणावामुळे होणारा त्रास कमी करणे साठी आरोग्याची काळजी घ्या. कॅन्सर सारखे दुर्धर आजार पहिल्या टप्प्यात तपासणी करून घ्या. आजाराकडे दुर्लक्ष करू नका. आहार वेळेत व सकस घ्या. असेही कासेगाव उप केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभांगी तनपुरे यांनी सांगितले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभा साखरे व डॉ. शुभांगी तनपुरे यांनी महिला ग्रामसेविकांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.*

**व्यक्तीमत्व विकास साधा - सीता पाटील**

महिला ग्रामसेवकांनी नेहमी अपडेट रहावे. चांगला आहार व व्यायाम बरोबर सुक्ष्म नियोजन करा. शासन निर्णय व परिपत्रके बारकाईने वाचा. आपली आकलन क्षमता वाढवा. असे आवाहन सह शिक्षिका सीता पाटील यांनी व्यक्त केले. याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी या संवर्गातून विस्तार अधिकारी झालेल्या प्रतिभा पवार यांचा सत्कार सिईओ दिलीप स्वामी यांचे हस्ते करणेत आला.

प्रास्ताविक जिल्हा मोहीम अधिकारी जावेद शेख यांनी केले. सुत्रसंचलन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव व अंगणवाडी पर्यवेक्षिका माधवी शिंदे यांनी केले. कार्यशाळेच्या नियोजनासाठी गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका ज्योती पाटील यांनी परिश्रम घेतले.

# कृषी उत्पन्न बाजार समिती, श्री बसवेश्वर मार्केट यार्डात परगावच्या शेतकऱ्यांसाठी निवासाची सोय करावी

**अक्कलकोट : प्रतिनिधी**

अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती, श्री बसवेश्वर मार्केट यार्डात परगावहून येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी निवासाची सोय करण्याची मागणी पुढे येत आहे.

अक्कलकोट तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता शेतमाल विक्रीसाठी येणार्या शेतकऱ्यांना अनेकदा मुक्काची समस्या असते. बऱ्याचदा लिलाव न झाल्यास, मोजमाप करण्यास विलंब झाल्यास परगावहून येणार्या शेतकर्यांना मुक्काम करावा लागतो. काही शेतकऱ्यांना यार्डात किंवा वाहनात मुक्काम करावे लागते. अशावेळी त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. सध्या अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक आहे. सहा. निबंधक सहकारी संस्था ही बाब गांभीर्याने घेवून शेतकरी निवास सुरु करण्याची मागणी पुढे येत आहे.

अक्कलकोट तालुक्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थावर प्रशासक कार्यरत आहे. प्रशासक म्हणून लोकप्रतिनिधीनी न केलेल्या विकास कामे ही त्यांनी करुन दाखवावीत. गेल्या अनेक महिन्यापासून प्रशासक म्हणून या



विविध संस्थेच्या माध्यमातून 'विकास'च हरविल्याचे दिसत आहे. प्रशासक हे शासकीय अधिकारी त्यांना दोन-तीन वर्षानी बदली होवून जावे लागते. ते कायम नसतात म्हणूनच त्यांच्या या अर्विभावात विकास खुंटल्याचे दिसत आहे. लोकप्रतिनिधी प्रमाणे आपल्या प्रशासक कालावधीत भरीव कामे करण्याची संधी मिळालेली असताना 'हमे क्या करना है, हम दो-तीन बरसके मेहमान' याप्रमाणे न वागता विकास कामे मार्गी लावण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनाचे २४ व २५ फेब्रुवारी रोजी मिरज येथे आयोजन

## कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांची माहिती

**सांगली : प्रतिनिधी**

सतरावे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन दि.२४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरज, जि. सांगली येथे होणार आहे. या संमेलनात सर्व कामगारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत या संमेलनाबाबत माहिती देताना केले.

बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज, जि.सांगली येथे हे संमेलन होणार असून शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

या दोन दिवसीय संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा




दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक तर कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत.

डॉ.भवाळकर यांनी लोकसंस्कृती विषयी विपूल लेखन केले असून मराठी विश्वकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. तसेच नाटक, कथासंग्रह, वैचारिक, ललित लेखन, समीक्षात्मक अशा विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ' या विषयावर डॉ विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स गृप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास गृप इंडिया लि.) या उद्योजकांची मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात 'कामगार चळवळीची कथा आणि व्यथा', 'मराठी साहित्यात कामगार जिवनाचे चित्र शोधताना', 'आम्ही का लिहितो ?', 'व्यसनमुक्तीची लढाई' या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रेक्षकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून अभिरुप न्यायालय देखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार या अभिरुप न्यायालय कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंत्री श्री. खाडे यांनी दिली.

# वाघोली ते २५/४ रस्ता दुरूस्त होईल काय?

**अकलूज : प्रतिनिधी**

वाघोली ते २५ /४ हा जवळजवळ सहा किलोमीटरचा अंतर असणारा रस्ता असून सन २००८ मध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून सदर रस्त्याचे काम झाले होते.प्रधानमंत्री ग्रामसडक सडक योजनेचा कालावधी संपल्यानंतर सदरचा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे वर्ग केला असून त्या रस्त्यावर आज मितीस जिल्हा परिषद ने कुठल्याही प्रकारचा दुरुस्ती विषयी खर्च केलेला नसून या सहा किलोमीटर रस्त्याची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे.



२५ /४ ते वाघोली हा जवळजवळ सहा किलोमीटर लांबीचा रस्ता असून सुरुवातीपासूनच ते वाघोली गावापर्यंत रस्त्याला जागोजागी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच ज्या ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी रस्ता पास करून पाईपलाईन खोदून नेलेली आहे त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत.सदर रस्त्यावरून वाघोली,वाफेगाव या गावातून शेकडो विद्यार्थी रोज अकलूजल, माळीनगर येथे शाळेसाठी ये जा करीत आहेत तसेच याच रस्त्यावरून सहकार महर्षी साखर कारखाना, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना,शंकर सहकारी साखर कारखाना,पांडुरंग सहकारी साखर कारखाना, दि सासवड माळी शुगर फॅक्टरी अशा साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणारी वाहने याच रस्त्यातून जात आहेत.जागोजागी पडलेल्या खड्ड्यामुळे स्कुल बस, दोन चाकी व इतर वाहनाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. तसेच सदर रस्त्यावर जागोजागी अतिक्रमण केल्यामुळे उसाचे वाहतूक होत असताना या रस्त्यावरून शालेय विद्यार्थ्यांना प्रवास करत असताना फार मोठा धोका होणेची शक्यता नाकारता येत नाही.सदर रस्त्याविषयी मा आ रणजितसिंह मोहिते पाटील, आ राम सातपुते मा, भा ज प जिल्हा संघटक धैर्यशील मोहिते पाटील यांनी तालुक्यातील विविध अडचणी, समस्या विषयी आढावा बैठक घेण्यात आली त्या बैठकीदरम्यान वाघोली लवंग सेक्शन, वाफेगाव या गावातील ग्रामस्थांनी वाघोली २५/४ रस्ता दुरुस्ती विषयी मुद्दा मांडला असता आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सदर रस्त्याविषयी विचारणा करून हा रस्ता लवकरात लवकर दुरूस्त करण्याविषयी सूचना देण्यात आल्या.

# मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडे ११० अर्ज प्राप्त, ५८ प्रकरणांवर कार्यवाही

**सोलापूर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सचिवालय जिल्हास्तरीय क्षेत्रीय कार्यालय कक्षाकडे माहे जानेवारीअखेर एकूण ११० अर्ज प्राप्त झाले असून सर्व अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्यापैकी ५८ प्रकरणांवर संबंधित विभागाकडुन कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरित ३४ प्रकरणांवर संबंधित विभागाकडून कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच एकूण १८ प्रकरणे अंतरिम आहेत. ही माहिती कक्षाच्या पदसिध्द विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न, शासन स्तरावर असलेली कामे त्या संदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवेदने स्वीकारुन त्यावर कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी क्षेत्रीय स्तरावरील मुख्यमंत्री सचिवालय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये नायब तहसिलदार अनिल निराळी व अव्वल कारकून एस. आर. चव्हाण आणि ए. बी. माळी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्राप्त अर्जांचा तात्काळ व गुणवत्तापूर्व निपटारा करावा, अशा सुचना सर्व जिल्हास्तरीय विभाग प्रमुख यांना देण्यात आल्याचे पत्रकात म्हटले आहे. तरी सर्वसामान्य नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिंदे सरकार शेतकरीविरोधी - राहुल बिडवे

**अकलूज : प्रतिनिधी**



सोलापूर जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांची वीज तोडणी शिंदे सरकारने चालू केलेली आहे यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे सध्या शेतकऱ्यांचा ऊस शेतामध्ये उभा आहे जो ऊस कारखान्याला गेला त्याचे बिल अद्याप आलेले नाही शेतकऱ्यांची ऊस केळी द्राक्ष पपई ऊस गहू मका व इतर पिके पाणी असताना दिवसाढवळ्या जळून जाणार आहेत आणि याला शिंदे सरकार जबाबदार राहणार आहे अशी सडकून टिका रयत क्रांती संघटनेचे राहुल बिडवे यांनी अकलुज येथे पत्रकाराशी बोलताना केले.

उन्हाळ्याच्या तोंडावर महावितरण कंपनीने विजतोडणी मोहीम हाती घेतली असून विज बील भरा अन्यथा विज तोडण्यात येई असा तुघलकी फर्मान काढल आहे. माळशिरस तालुक्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून वीज वितरण कंपनीने अचानक वीज बील भरण्याचे फर्मान काढले असून फक्त दोनच तास शेतीपंपाची वीज सोडण्यास सुरूवात केली आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर महावितरण कंपनीने अचानक वीज बंदचा निर्णय घेतल्याने हातातोंडाशी आलेली पिके जुळून जाणार आहेत मात्र मागील काळात शेतकऱ्यांचा कळवळा असणारे राजकर्ते मात्र मुग गिळून गप्प आहेत त्यामुळे हाताची घडी तोंडावर बोट अशी त्यांची अवस्था झालेली दिसून येत आहे.

ऊस, केळी, कलिंगड, द्राक्षे, मका आदी पिकांना सध्या पाण्याची गरज असून ऐन भरात असताना पाणी न मिळाल्यास या पिकांचे मोठे नुकसान होण्याची होणार आहे असे राहुल बिडवे यांनी सांगितले. मात्र झोपेचे सोंग व शेतकऱ्यांचा कळवळा असणाऱ्या राजकर्त्यांना जाग कधी येणार? असाही प्रश्न शेतकऱ्यांमधून विचारला जात आहे.

माळशिरस तालुक्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे दोन आमदार व राष्ट्रवादीचे एक आमदार असताना वीज तोडणी बाबत सध्या ते मूग गिळुण गप्प आहेत वीज तोडणी जर नाही थांबली तर या लोकप्रतिनिधींना भविष्यात जनता त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही.

## सौ. पुष्पा धुमाळ यांचे निधन



**सातारा** : वसंतदादा पाटील विद्यालय रहिमतपूर येथे प्राध्यापिका असलेल्या सौ. पुष्पा रघुनाथ धुमाळ (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून असा परिवार आहे. त्या मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांचा दशक्रिया विधी गुरूवार, दि. १६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ९ वाजता संगममाहुली, सातारा येथे होणार आहे. श्री रघुनाथ ज्ञानू धुमाळ यांच्या त्या पत्नी, तर स्वप्नील रघुनाथ धुमाळ यांच्या त्या आई होत.

# महाबळेश्वर येथे प्रथमच घोडे तपासणी शिबीर

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

'द आय व्हेट' यांच्या वतीने पशुसंवर्धन विभाग, सातारा, क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ व हॉर्स व पोनी संघटना,महाबळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने घोड्यांची नेत्र व सर्व रोग निदान तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर येथील वेण्णालेक येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. यावेळी जगप्रसिद्ध घोडे नेत्रतज्ञ डॉ रिचर्ड जे. मॅकमुलेन यांच्यासह 'द आय व्हेट'च्या संस्थापक डॉ कस्तुरी भडसावळे व टीमने घोडयांच्या डोळे तपासणी केली या उपक्रमाला घोडे व्यावसायिक संघटनेकडून उदंड प्रतिसाद मिळाला. या शिबिरात अनेक घोड्यांची नेत्रतपासणी करण्यात आली तपासणी वेळी बहुतेक घोड्यांना ऍलर्जीमुळे डोळ्यांच्या आजाराने त्रास होत असल्याचे निदर्शनास आले या घोड्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली यामधील दोन घोड्यांना तातडीने उपचाराची गरज असल्याचे निदर्शनास आले या घोड्यांचे तेथेच फोटो डायनॅमिक लेझर थेरपी द्वारे उपचार करण्यात आले यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ विलास आहेर,जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त



डॉ अंकुश परिहार,डॉ अनिल लहाने,डॉ बालाजी अंभोरे डॉ जितेंद्र पाठक,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ जयसिंग सिसोदिया,डॉ अजित माळी डॉ सत्यवान अगिवले यांच्यासह पशुवैद्यक उपस्थित होते.

'द आय व्हेट' भारतातील पहिले आणि एकमेव विशेष पशुवैद्यकीय नेत्रचिकित्सा क्लिनिक आहे. डॉ.कस्तुरी या मुंबईतील पशुवैद्यकीय पदवीधर असून त्यांनी ऑस्ट्रेलियात स्वतःची नेत्रचिकित्सा सल्लामसलत सुरू केली होती आता त्या भारता मध्ये 'द आय व्हेट' मुंबई आणि पुणे येथे कार्यरत आहेत त्यांच्या माध्यमातून हे शिबीर संपन्न झाले शिबीर यशस्वीतेसाठी हॉर्स व पोनी संघटनेचे विशेष सहकार्य लाभले.

# गृहविज्ञान महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराची सांगता

**अकलूज : प्रतिनिधी**

खंडाळी अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २ ते ८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत ' युवकांचा ध्यास ग्राम व शहर विकास, अंधश्रद्धा निर्मूलन , व्यसनमुक्ती व महिला कौशल्य विकास, स्त्रियांचे आरोग्य, या विषयावर जिल्हा परिषद प्रा. शाळा , मौजे खंडाळी येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. या शिबिराचा सांगता समारंभ बुधवार दि. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अकलूज येथिल पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. रावसाहेब पताळे हे होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे होते. याप्रसंगी खंडाळी ग्रामपंचायतच्या सरपंच श्रीमती सुनीता सुरवसे, उपसरपंच श्रीमती सुरेखा पताळे, माजी सरपंच रावसाहेब भोसले ग्रामपंचायत सदस्य अमर रिसवडकर, अनिल भोसले, रिकेष चव्हाण, मुख्याध्यापिका श्रीमती महाजन, वाहतूक नियंत्रक राजू गोसावी, ग्रामसेवक रोडे, नाना चंदनकर, दत्तात्रय पताळे, महेशकाका पताळे, महादेव साबळे, पत्रकार मंगेश सोनार, सुरेश सुरवसे, विठ्ठल पताळे, राहुल गनगे, अशोक पताळे, शरद भोसले, दत्तात्रय वाघमारे तसेच डॉ. छाया भिसे, प्रा. के. के. कोरे, कार्यालय प्रमुख विजय कोळी, अविनाश पताळे, दीपा येंजाडे, ग्रामपंचायत खंडाळीचे सर्व कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील स्वयंसेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सात दिवसीय शिबिराप्रसंगी विविध उपक्रमांचे आयोजन




करण्यात आले होते. यामध्ये युवकांचा ध्यास ग्राम व शहर विकास या विषयावर डॉ. राजकुमार पाटील यांचे व्याख्यान, संरक्षित अन्नपदार्थ व पोषक पुरक पदार्थ या विषयावर डॉ. जयशीला मनोहर यांचे व्याख्यान व प्रदर्षणी, एल.पी.जी गॅस सुरक्षा या विषयावर भारत गॅस अकलूज चे संदीप देसाई, राजू दळवी व हारून पठाण यांनी प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण केले. भरतकाम या विषयावरील कार्यशाळेत डॉ. राजश्री निंभोरकर यांनी मार्गदर्शन केले, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर महर्षी प्रशालेचे शिक्षक श्री. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले.खंडाळी येथील आरोग्य केंद्रामध्ये महिला व बालकासाठी कायदे आणि गर्भवती व स्तनदा मातांचा आहार या विषयावर डॉ. छाया भिसे व डॉ. भारती भोसले यांनी मार्गदर्शन केले. बालकांसाठी सृजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर व्यसनमुक्ती, स्त्री जन्म, मोबाईलचे दुरुपयोग या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण, जलसंरक्षण, पर्यावरणाचे संरक्षण, शिक्षणाचे महत्त्व या विषयावर जनजागृती रॅली, जिल्हा परिषद प्रा. शाळेत वृक्षारोपण व परिसर स्वच्छता, वस्त्रशास्त्र विषयासंदर्भात ग्रामस्थांना बांधणी व एम्ब्रॉयडरी वस्तूंचे प्रदर्शन व माहिती, पर्यावरण पूरक उपक्रमाअंतर्गत माती विरहित शेती, स्वयंपाक घरातील कचरा व्यवस्थापन, इत्यादी विषयांवर स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना माहिती दिली.

सदर शिबीर महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा मा. कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ऋषी गजभिये, सूत्रसंचलन कु. सानिया तांबोळी व कु. अक्षरा देवकर आणि आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. भारती भोसले यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# बिबट्याच्या फोटोंमुळे सज्जनगडावरील सर्व दंगेखोर माकडे गायब...


## संस्थांनचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद स्वामी यांच्या संकल्पनेतून अजब उपायामुळे समर्थभक्त सुखावले!

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा तालुक्यातील परळी पश्चिमेला परळी खोऱ्यात धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या सज्जनगडावर सध्या राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामींचा ३४१ वा पुण्यतिथी महोत्सव अर्थात दास नवमी उत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे.

सज्जनगडावर दर्शनासाठी तसेच निवासासाठी येणाऱ्या सर्व समर्थ भक्तांना एक वेगळाच सुखावह अनुभव मिळत आहे तो म्हणजे सज्जनगडावर असलेल्या आपल्या मरकटलीलांनी भंडावून सोडलेल्या माकडांपासून पूर्ण सज्जनगड मुक्त झाला आहे .आणि याचे कारण आहे... बिबट्या .

ऐकून नवल वाटेल ,मात्र गेले दोन-तीन महिने सज्जनगड आणि परिसरातील गावातून बिबट्या आणि त्याची दोन पिल्ले संचार करत आहेत. सज्जनगडावरील निसर्गरम्य वातावरणात हा बिबट्या फिरत असल्याचे अनेकदा अनेक ग्रामस्थांनी पाहिले. अगदी ही बातमी तयार करतानाही मंगळवारी सकाळी सज्जनगड बसस्थानकाजवळ असलेल्या भातखळ्याच्या पाठीमागे बिबट्या ग्रामस्थांच्या नजरेत पहाटेचा दिसून आला आणि त्यामुळे रामदास स्वामी संस्थांननी येथे गडावर येणाऱ्या लोकांना सजग करण्यासाठी बिबट्या पासून सावध रहा अशा आशयाचे फलक लावले .मात्र या फलकांचा उपयोग तसा काहीसा झालाच नाही. त्यानंतर संस्थांनचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद स्वामी यांच्या संकल्पनेतून आजूबाजूला एकट्या-दुकट्याने जाऊ नये म्हणून परिसरात आणि समाधी मंदिराच्या बाजूला बिबट्याचा भव्य चेहऱ्याचा फ्लेक्स उभारला.



सज्जनगड येथील श्री समर्थ समाधी मंदिर शेजघर येथे लावण्यात आलेले बिबट्याचे भव्य फलक. (छाया : अतुल देशपांडे)

खरे पाहता हा फलक भक्तांना जाणीव करून द्यावी की या परिसरात बिबट्या आहे यासाठी होता, मात्र याचा परिणाम उलटाच झाला. आणि हा बिबट्याचा प्रचंड भीती वाटणारा आणि डोळे रोखलेला फोटो पाहून सज्जनगडावर असलेली सुमारे शंभर माकडांची टोळी मात्र हा भीतीदायक फोटो पाहून घाबरून त्याच्या नजरेला नजर न देता समाधी मंदिर परिसरातून कायमची निघून गेली.

नाही तर गेले दोन ते तीन वर्षे या माकडांनी उच्छाद मांडला होता .सज्जनगडावर एसटी स्टँड पासून पायऱ्यांवरून येत असताना छत्रपती शिवाजी महाद्वार, समर्थ महाद्वार या परिसरातील पायऱ्यांवर तेथे असलेल्या छोट्या विक्रेत्यांना ही माकडे प्रचंड सतावत होती. या परिसरातून जाणाऱ्या भक्तांच्या पिशव्या उचकणे ,मोबाईल पळवणे, हातातील वस्तू घेऊन धुम ठोकणे, वस्तू नासाडी करणे अशा प्रकारच्या त्रासांमुळे सज्जनगडवासी अतिशय त्रस्त झाले होते .समाधी मंदिर परिसरात लावलेला बिबट्याचा फलक एक चांगली नामी शक्कल असल्याचे लक्षात आल्यावर संस्थांनच्या वतीने असे बिबट्याचे चेहरे असलेले फ्लेक्स धाब्याचा मारुती, पिण्याचा पाण्याचा तलाव तसेच सज्जनगडावरील अंगलाई देवी मंदिर आणि लोकमान्य टिळक प्रवेशद्वारापाशी लावण्यात आले.

या फलकाचा नामी उपाय अतिशय तंतोतंत ठरल्यामुळे परिसरातून सर्वच माकडे अचानक गायब झाली आणि सज्जनगड वर राहणाऱ्या सर्वच निवासी भक्तांनी अक्षरशः सूस्कारा सोडला. सध्या मंदिराच्या परिसरात शेजघराजवळ पाहायला मिळणारा बिबट्याचा भव्य फोटो तसेच एलईडी प्रक्षेपणाद्वारे सुरू असलेले संस्थांचे कार्य पाहता पाहता त्या एलईडीवरही अचानक बिबट्या पाहायला मिळतो .अशा प्रकारचे हे फलक आता गडावरील गवताळ भागात जेथे माणसांचा वावर कमी आहे तेथे लावण्याचाही मानस दुर्गाप्रसाद स्वामी यांनी व्यक्त केला आहे.संस्थांनचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद स्वामी यांनी सांगितलेले ही माकडे हटवण्याची अजब युक्ती मात्र ऐकल्यावर चेहऱ्यावर हसू उमटणारी ठरत आहे .त्यामुळे आता सज्जनगडावर माकडांच्या चाळ्यापासून निर्धास्त रहात ,बिनधास्त या आणि समर्थ समाधीचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा आनंद लुटा असे आवाहनच संस्थांनच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाबळेश्वर येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कबड्डी व क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद व महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लब यांच्यावतीने येत्या ११ व १२ फेब्रुवारी या कालावधीमध्ये दोन दिवसीय राज्यस्तरीय कबड्डी व क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आहे. या स्पर्धांसाठी राज्यभरातील नगरपरिषदानी उत्फूर्त सहभाग दर्शविला आहे.

राज्यातील नगरपरिषदा महाबळेश्वर पालिकेच्या या स्पर्धे साठी सहभागी होणार असून क्रिकेट स्पर्धेसाठी ६0 संघ व कबड्डीसाठी ५५ संघांची नोंदणी झाली आहे. क्रिकेट व कबड्डी या दोन्ही स्पर्धांसाठी पोलो व पोलीस परेड मैदानावर जय्यत तयारी सुरु असून पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांच्या विशेष मार्गदर्शन व सहकार्याने या स्पर्धा होणार आहेत. या सामन्यांच्या तयारी व स्पर्धा यशस्वीतेसाठी महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लबचे अध्यक्ष अहमद नालबंद, उपाध्यक्ष बबन जाधव, सचिव आबाजी ढोबळे यांच्यासह पालिका अधिकारी कर्मचारी विशेष मेहनत घेत आहेत या स्पर्धेसाठी येणा-या संघांच्या स्वागतासाठी महाबळेश्वर हॉटेल असोसिएशन , महाबळेश्वर हॉटेल व रेस्टॉरंट असोशिएशन व्यापारी व नागरिक यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

# मोटारसायकलवरून पडल्याने एकाचा मृत्यू

**सातारा : प्रतिनिधी**

मोटारसायकल वरून पडल्याने एकाचा मृत्यू झाल्याची नोंद बोरगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, विकास बबनराव विभुते वय ४२ रा. सासपडे, ता. सातारा हे मोटरसायकल वरून पडल्याने गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद बोरगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बॉम्बे रेस्टॉरंट परिसरातील जुगार अड्ड्यावर छापा

**सातारा : प्रतिनिधी**

बॉम्बे रेस्टॉरंट परिसरातील जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला असून चौघांना नोटीस बजावली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, खेड, ता. सातारा गावच्या हद्दीतील बॉम्बे रेस्टॉरंट परिसरात असणाऱ्या नटराज हॉटेलच्या मागील पत्र्याच्या शेडमध्ये अविनाश कुमार वाडेकर रा. विकास नगर सातारा, अनिल लक्ष्मण वाघमारे रा. गुरुवार पेठ सातारा, बाळासो मारुती शिंदे रा. वेळेकामथी, ता. सातारा, पंकज बिरसिंग जाधव रा. क्षेत्र माहुली सातारा हे चौघेजण जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्याकडून १०१५ रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

# फलटण शहरात घरफोडी

**सातारा : प्रतिनिधी**

फलटण शहरात अज्ञात तीन चोरट्यांनी घरफोडी केल्याची तक्रार फलटण शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३ फेब्रुवारी रोजी पावणे पाच वाजण्याच्या दरम्यान राजेंद्र गुलाब गायकवाड रा. बोरावके वस्ती, अलगुडेवाडी, ता. फलटण यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप कशाने तरी तोडून घरात प्रवेश करून अज्ञात तीन चोरट्यांनी कपाटात ठेवलेली रोख रक्कम दहा हजार पाचशे रुपये चोरून नेली आहे.

याबाबतची फिर्याद फलटण शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक फौजदार शिंदे करीत आहेत.

# जल जीवन मिशन अंतर्गतच्या ७९४ कामांचे ई-भूमिपूजन

## जल जीवन मिशन अंतर्गतची कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करावी - पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**सातारा : प्रतिनिधी**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील ७९४ कामे नव्याने सुरु होणार आहेत. सुरु होणाऱ्या कामांवर गावच्या सरपंचांनी लक्ष देवून ही कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करावीत व राज्यात सातारा जिल्ह्याचा आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशिय सभागृहात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, सातारा, जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन व विविध पाणी पुरवठा योजनांचा ई-भूमिपुजन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी आमदार महेश शिंदे, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प




संचालक चंचल पाटील, कार्यकारी अभियंता सुनिल शिंदे आदी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे पाणी देणे हे जल जीवन मिशन योजनेचे उद्दिष्ट असल्याचे सांगून पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील म्हणाले, विविध पाणी पुरवठ्याची एकूण ७९४ कामे आहेत याची अंदाजित रक्कम ११७७.0९ कोटी इतकी आहे. या कामांवर सरपंचांनी स्वत: लक्ष देवून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करावीत. या कामांचे त्रयस्त यंत्रणाकडून तपासणी करण्यात येणार आहे. राज्यातील मोठ्या योजनांना मी स्वत: भेटी देवून कामांची तपासणी करणार आहे. गैरप्रकार आढळल्यास कारवाई केली जाणार आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे काम चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी २ हजार २२६ पदांची निर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्याला उपअभियंताही देण्यात आलेला आहे. तसेच २२७ अनुकंपाधारक असलेल्या उमेदवारांना कामावर रुजु होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

छोट्या छोट्या वस्ती, वाड्यांसाठी म्हणजे जेथे पाणी पुरवठ्याच्या योजना घेता येत नाही अशा ठिकाणी स्व. मिनाताई ठाकरे योजनेतून पाण्याच्या साठवण टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत. जल जीवन मिशन योजनेंतर्गत राज्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे प्राधान्य आहे. या योजनेतून महिलांच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. पिण्याचे पाणी ग्रामस्थांना सहज उपलब्ध व्हावे हे मोठे पुण्याचे काम आहे. हे काम जल जीवन मिशन अंतर्गत सरपंचांनी करावे, असे आवाहनही पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील यांनी केले.

जिल्ह्यातील पाणी पुरवठ्यांच्या योजनांना शासनाने मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. तसेच जिल्ह्याच्या हिताचे अनेक निर्णयही घेण्यात आले आहे. प्रशासनही केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना गावपातळीपर्यंत सक्षमपणे पोहचवित आहे, असे आमदार महेश शिंदे यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. जयवंशी म्हणाले, जल जीवन मिशन अंतर्गत २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाणे पाणी उपलब्ध करुन देण्याचा उद्देश आहे. यामध्ये केंद्र शासनाचा ५0 टक्के व राज्य शासनाचा ५0 टक्के हिंस्सा असून १0 टक्के निधी लोकसभागातून उपलब्ध करणे असे योजनेचे स्वरुप आहे. या अंतर्गत बहुतांश योजना सौर ऊर्जेवर घेण्यात येणार आहे. स्व. मिनाताई ठाकरे योजनेतून ४५ पाणी साठवण टाक्या बसविण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खिलारी यांनी प्रास्ताविकात जल जीवनमिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरु असलेल्या व सुरु करावयाच्या कामांची माहिती दिली. तसेच शुभारंभ होणाऱ्या पाणी पुरवठा योजना वेळेत पूर्ण करण्याची ग्वाहीही यावेळी दिली.

या कार्यशाळेस जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी, विविध गावचे सरपंच, ग्रामसेवक उपस्थित होते.

# मेढा नगरपंचायत कर आकारणी सुनावणीसही स्थगिती मिळेल

## आ. शिवेंद्रसिंहराजे; अमित कदमांनी फुकटची काळजी करू नये

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा पालिका आणि मेढा नगरपंचायत अशा दोन वेगवेगळ्या फाईल्स नगर विकास विभागाकडे गेल्या होत्या. नगर विकास विभागाकडून सातारा पालिकेची फाईल आधी पोहचली त्यामुळे त्यावर आधी स्वाक्षरी झाली. मेढा नगरपंचायतीची फाईल सुद्धा मुख्यमंत्र्याच्या स्वाक्षरीसाठी सादर झालेली आहे. त्यामुळे येत्या दोन- तीन दिवसात वाढीव कर आकारणी सुनावणी स्थगित केल्याचे आदेश निघतील. ही एक प्रशासकीय कार्यालयीन प्रक्रिया आहे. मी दिलेला शब्द पूर्ण करणारा आमदार आहे, हे समस्त जावलीकर जाणतात. त्यामुळे अमित कदमांनी फुकटची काळजी दाखवू नये, असा टोला आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लगावला आहे.



सातारा नगर पालिकेप्रमाणेच मेढा नगरपंचायतीच्या करवाढ आकारणीस स्थगिती देण्याची मागणी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे पूर्वीच केली होती. मुख्यमंत्र्यांनी त्याचवेळी सातारा प्रमाणेच मेढा नगरपंचायतीच्या चतुर्थ वार्षिक कर आकारणीस स्थगिती देण्याच्या तोंडी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या होत्या आणि त्याचवेळेपासून सदरची प्रक्रिया थांबली आहे. शासनाकडून अधिकृत आदेश मिळण्यासाठी सातारा पालिका आणि मेढा नगरपंचायत असे दोन स्वतंत्र प्रस्ताव नगर विकास विभागाकडे दाखल करण्यात आले होते. दोन वेगवेगळ्या फाईल्स होत्या त्यात नगरविकास विभागाकडून सातारा पालिकेची फाईल आधी पोहचली. मेढा नगरपंचायतीची फाईलही नगरविकास विभागाकडून मुख्यमंत्र्यांकडे स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आली आहे. ही एक प्रशासकीय कार्यालयीन प्रक्रिया आहे. त्यानुसार येत्या दोन- तीन दिवसात याही फाईलवर स्वाक्षरी होईल. मी कालच मुख्यमंत्री ना. शिंदे यांची भेट घेतली असून मेढा नगरपंचायतीच्या कर आकारणी स्थगितीबाबत पुन्हा चर्चा झाली. त्यामुळे येत्या दोन- तीन दिवसात मेढ्याच्या कर आकारणीस स्थगिती मिळाल्याचे अधिकृत आदेश निघतील.

मेढा नगरपंचायतीची चतुर्थ वार्षिक कर आकारणी सुनावणी प्रक्रिया यापूर्वीच स्थगित करण्यात आली आहे आणि नगर विकास विभागाकडून लवकरच तसे अधिकृत आदेश जारी होतील. त्यामुळे आमदारांनी शब्द पाळला नाही अशी आवई उठवत अमित कदमांनी फुकटची काळजी दाखवून जावलीतील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नये. दिलेला शब्द पाळणारा मी माणूस आहे, हे जावलीतील जनता, मतदार यांच्यासह अमित कदम यानांही चांगले माहिती आहे. त्यामुळे कोणत्याही बाबतीत अमित कदमांनी जावलीकरांची काळजी करण्याचे काहीच कारण नाही, असेही आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी पत्रकात म्हटले आहे.

# एसटी बसचे नुकसान केल्याप्रकरणी ट्रक चालकावर गुन्हा

**सातारा :** एसटी बसचे नुकसान केल्याप्रकरणी ट्रक चालकावर लोणंद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत माहिती अशी, दि. ६ फेब्रुवारी रोजी ९ वा.चे सुमारास आदर्की, ता. फलटण हद्दीतील एसटी स्टँडसमोर उत्तरेश्वर गुरुलिंग वनवे रा. अंबड, ता. माढा, जि. सोलापूर यांनी त्यांच्या ताब्यातील बस क्रमांक एमएच २0 बीएल २२५८ ही बस थांबवली असताना समोर उभा असलेला ट्रक क्रमांक एमएच ११ बीडी 00१५ वरील चालक कृष्णा दिलीप मोरे रा. पिंपरखेड, ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव याचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पाठीमागे येऊन बसला धडकला. यामध्ये एसटी बसच्या पुढची काच फुटून नुकसान झाले आहे.

# साहित्य संमेलनाचे खा.सुप्रिया सुळे यांच्या हस्ते १२ फेब्रुवारीला उद्घाटन

**वडूज : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य मुख्य केंद्र मराठी साहित्य मंडळ आयोजित मराठी साहित्य संमेलन रविवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२३. सकाळी १0.00 वाजता वडूज ता खटाव येथे संपन्न होत असून या संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन तालुका अध्यक्षा सीमा मंगरूळे यांनी केले आहे. खासदार मा. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन होणार आहे तर माजी न्यायाधीश मा. रावसाहेब झोडगे (पुणे) संमेलनाध्यक्ष असणार आहेत. नगरसेविका आरती श्रीकांत काळे स्वागताध्यक्ष आहेत.ज्येष्ठ कवयित्री ललितताई गवांदे रेखा दीक्षित, सुरेश लोहार, विनायक जाधव (कराड) (महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष म. सा. मं.)सिद्धार्थ कुलकर्णी (नागपूर) (विदर्भ विभाग प्रदेश अध्यक्ष म. सा. मं.) डॉ. रजनी वी (सोलापूर), मा. निलेश जवळ (समता परिषद, पुणे जिल्हा अध्यक्ष) माजी नगराध्यक्ष डॉ. महेश गुरव, महादेव सरतापे,प्रा.बंडा गोडसे गणेश शिंदे, राजेश थळकर,प्रा. गंगाधर भुतारे (ठाणे) गायत्री विभुते (कराड)आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

राज्यघटनेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे का ?या विषयावर परिसंवाद,मयूर पंख या बालकविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा, जीवनगौरव पुरस्कार आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# म्हसवड येथील रस्ता कामावर अधिकाऱ्यांचा अंकुश का नाही - प्रा. विश्वंभर बाबर

**म्हसवड : प्रतिनिधी**

म्हसवड येथील सुरू असणाऱ्या सातारा-पंढरपूर हायवेच्या कामावर अधिकाऱ्यांचा अंकुश का नाही? अशी लेखी विचारणा कृषीरत्न प्रा. विश्वंभर बाबर यांनी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ पुणे कार्यालयाकडे समक्षपणे केली आहे.

म्हसवड येथे सातारा-पंढरपूर हायवे क्रमांक १४१ या रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामावर अनेक प्रकारच्या तक्रारी असून काम निकृष्ट प्रतीचे होत असल्याने त्याबाबतचे लेखी निवेदन रस्ते विकास महामंडळ पुणे कार्यालयाच्या अधीक्षक अभियंता अश्विनी घोडके यांना कृषिरत्न प्रा.विश्वंभर बाबर यांनी समक्ष दिले.

सातारा-पंढरपूर या महामार्गाचे म्हसवड शहरालगत काम सुरू आहे. या कामावर अधिकाऱ्यांचा कसलाच अंकुश नसल्याचे दिसून येत आहे. 'ट्राफिक आहे' या नावाखाली सदर रस्त्याचे काम प्रामुख्याने



म्हसवड येथील रस्ता बांधकामावर अधिकाऱ्यांचा अंकुश का नाही - प्रा. विश्वंभर बाबर.

रात्रीच्या वेळी उरकण्यात आलेले आहे, याचे गुपित काय? त्याचबरोबर बहुतांशी काम पेवर मशिनरी ऐवजी मजुरांकडून करून घेतले असल्याने त्याचा समपातळीपणा रहात नसून दर्जाही निकृष्ट होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, सदर रस्त्याच्या दोन थरांपैकी खालच्या थराचे मटेरियल अत्यंत निकृष्ट असून सिमेंटचा दर्जा व प्रमाण कमी असल्याने वाळू व खडीचे तुकडे लगेचच मोकळे झालेले दिसून आलेले आहेत. रस्ता कॉंक्रिटीकरण झाल्यानंतर त्या कामावर नियमितपणे व पुरेशा प्रमाणात पाणी मारणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.पाणी मारण्याबाबत केवळ दिखाऊपणा केला जात आहे.

म्हसवड येथील हायवेच्या रस्त्याचे काम दर्जेदार होण्यासाठी शासकीय अधिकाऱ्याने त्यावर अंकुश ठेवावा. तसेच ठेकेदाराच्या निकृष्ट कामाची चौकशी करून त्याच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी प्रा. विश्वंभर बाबर यांनी कार्यकारी अभियंता अश्विनी घोडके यांच्याकडे केली आहे.

म्हसवड येथील रस्त्याच्या बांधकामासंबंधी कार्यकारी अभियंता अश्विनी घोडके यांना निवेदन देताना प्रा. विश्वंभर बाबर.

# विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर उंब्रज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कराड तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या एका विवाहितेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याप्रकरणी त्याच गावात राहणाऱ्या आनंदराव नानासो पवार यांच्यावर उंब्रज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या विनयभंग प्रकरणी पीडितेकडून आनंदराव पवार याच्या विरोधात उंब्रज पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक फौजदार तावरे करीत आहेत.

## राज्यस्तरीय प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या

# सातारा जिल्हाध्यक्षपदी सचिन मोरे यांची बिनविरोध निवड

**फलटण : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या सातारा जिल्हाध्यक्षपदी फलटण येथील सचिन संपतराव मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. राज्यध्यक्ष सुनील जगताप यांनी सचिन मोरे यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करीत त्यांना निवडीचे पत्र दिले. लोणंद येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित राज्याच्या पत्रकार संघाच्या बैठकीत मोरे यांची निवड केली.

यावेळी राज्य उपाध्यक्ष राजेंद्र काळभोर, कार्याध्यक्ष सचिन सूंबे, खंडाळा तालुकाध्यक्ष मोहन बोरकर, आबा धायगुडे, मंगेश माने, विजय शेळके, बोलकीस्ट



शेख मॅडम, साथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष कय्युम मुल्ला, मुकुंदराज काकडे, अमोल काकडे, बापू दोरके यांच्यासह अन्य राज्यस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.

सचिन मोरे फलटण तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात गेली १९ वर्ष कार्यरत असून त्यांच्या मालकीच्या धैर्य टाईम्स वृत्तपत्र, चॅनेल व वेबपोर्टल ते चालवित आहेत. पत्रकारितेमधील त्यांच्या उल्लेखनीय कार्याच्या पार्श्वभूमीवर सदरची निवड करण्यात आली आहे.

सचिन मोरे यांच्या निवडीचे वृत्तपत्र आणि डिजिटल मीडिया या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# एनएसए अजित डोभाल - पुतीन यांची भेट

## रशियन अध्यक्षांनी सामरिक भागीदारीवर केली चर्चा; अफगाण - दहशतवादावरही फोकस

**मॉस्को : वृत्तसंस्था**

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी मंगळवारी रशियन राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. यावेळी उभयंतांनी भारत-रशिया सामरिक भागीदारी व द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. मॉस्को स्थित भारतीय दूतावासाने ही माहिती दिली.

अजित डोभाल अफगाणिस्तानवर बहुपक्षीय सुरक्षेच्या मुद्यावरील बैठकीत सहभागी होण्यासाठी मॉस्को दौऱ्यावर गेलेत. यावेळी भारत-रशिया रणनितीक भागीदारी लागू करण्याच्या दिशेने काम सुरू ठेवण्यावर मतैक्य झाले.

अफगाणिस्तानवरील सुरक्षा परिषदेच्या सचिवांच्या पाचव्या बैठकीत छडअ डोभाल म्हणाले - अफगाणिस्तान सध्या कठीण स्थितीतून मार्गक्रमण करत आहे. भारत या या संकटाच्या काळात अफगाणच्या जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही. भारताने अफगाणिस्तानला ४०,००० मेट्रिक टन गहू, ६० टन औषधे, ५ लाख कोविड लस पाठवून संकटकाळात मदत केली आहे.



बैठकीत अफगाणिस्तानपुढील मानवीय व सुरक्षा आव्हानांवरही चर्चा झाली.

एनएसए डोभाल म्हणाले, अफगाणी जनतेचे कल्याण व मानवीय गरजा पूर्ण करण्यास भारताचे प्राधान्य आहे. दहशतवाद सर्वात मोठा धोका बनला आहे. कोणत्याही देशाने अफगाणिस्तानच्या मार्गे दहशतवाद पसरू नये असे आम्हाला वाटते. अफगाणिस्तानच्या नैसर्गिक संसाधनांचा वापर त्यांच्या नागरिकांच्या कल्याणासाठीच झाला पाहिजे.

ते म्हणाले, लश्कर-ए-तोएबा, जैश-ए-मोहम्मद व दाएश सारख्या अतिरेकी संघटनांचा निपटारा करण्यासाठी सदस्य देशांत गुप्तहेर व सुरक्षा सहकार्य असणे आवश्यक आहे.

बैठकीत रशिया व भारतासह इराण, कझाकिस्तान, किर्गिस्तान, चीन, ताझिकिस्तान, तुर्कमेनिस्तान व उझपेकिस्तानचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत रशिया व भारतासह इराण, कझाकिस्तान, किर्गिस्तान, चीन, ताझिकिस्तान, तुर्कमेनिस्तान व उझपेकिस्तानचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अजित डोभाल यांनी गत ऑगस्ट महिन्यात रशियाचे सुरक्षा सल्लागार निकोलाई पत्रुशेव यांची भेट घेतली होती. यावेळी अफगाणिस्तान, दहशतवाद व रशिया-युक्रेन युद्धावर चर्चा झाली होती.

# ठाण्यात दिव्यांग व विशेष मुलांसोबत मुख्यमंत्री शिंदे यांनी वाढदिवस केला साजरा



**ठाणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यातील दिव्यांग व विशेष मुलांसोबत आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी दिव्यांगांच्या रोजगार मेळाव्यास शुभेच्छाही दिल्या. तसेच किसन नगर येथील मुलांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते खाऊ व पुस्तके वाटप करण्यात आली.

स्वयम दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने ठाण्यातील स्व. गंगूबाई संभाजी शिंदे बहुउद्देशीय सभागृहात दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिव्यांगांच्या रोजगारासाठी उपयुक्त अशा स्वयम् ॲपचे अनावरण, स्वयम् च्या 'झेप' या स्मरणिकेचे व संकेतस्थळाचे अनावरणही मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वयम् ॲपच्या माध्यमातून दिव्यांगांना रोजगार संधीची माहिती मिळणार आहे. यावेळी दिव्यांगांसाठी भरविण्यात आलेल्या विशेष प्रदर्शनाची पाहणीही मुख्यमंत्र्यांनी केली. यावेळी स्वयम् च्या संस्थापक डॉ. निता देवळालकर उपस्थित होत्या.

**नागरिकांच्या शुभेच्छांचा केला स्वीकार**

मुख्यमंत्र्यांनी आनंद आश्रमात धर्मवीर दिवंगत आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, माजी महापौर नरेश म्हस्के आदी उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या शुभेच्छांचा स्वीकार मुख्यमंत्र्यांनी केला. दरम्यान शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व क्रिकेट किटचे वाटप करण्यात आले.

# तुर्किये-सीरियातील भूकंपात १७ हजार १७६ मृत्यू

## सॅटेलाइट इमेजमध्ये दिसले - सीरियामध्ये सामूहिक कबरीत मृतदेह पुरले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तुर्किये आणि सीरियामध्ये सोमवारी झालेल्या ३ मोठ्या भूकंपांमुळे प्रचंड विध्वंस झाला आहे. एएफपीच्या वृत्तानुसार, दोन्ही देशांमध्ये मृतांची संख्या १५ हजारांच्या पुढे गेली आहे. जखमींची संख्या ४० हजारांच्या जवळ पोहोचली आहे. WHO आणि UN सह जगभरातील ७० हून अधिक देश मदतीसाठी पुढे आले आहेत. स्थानिक प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, सीरियामध्ये ३ लाख लोक बेघर झाले आहेत.

तुर्कियेचे अध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगन यांनी कबूल केले आहे की, भूकंपाबद्दल सुरूवातीला आमच्याकडून म्हणावी तशी मदत झाली नाही. सरकारवरील वाढत्या जनक्षोभामुळे त्यांनी ही कबूली दिली. वास्तविक भूकंपानंतर अनेक भागातील लोकांनी मदतकार्य उशिरा पोहोचणे तसेच मदत साहित्य वेळेवर न मिळाल्याच्या तक्रारी केल्या होत्या. सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. तथापि,



अध्यक्ष एर्दोगन म्हणाले की सरकार सर्व लोकांना मदत करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे. आणि देशात कोणीही बेघर राहणार नाही.

दरम्यान, तुर्कीमध्ये ट्विटर ब्लॉक करण्यात आले आहे. वास्तविक, तुर्की सरकारने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सोशल मीडियावरील अपप्रचाराच्या विरोधात विधेयक मंजूर केले होते. या अंतर्गत, सोशल मीडिया कंपन्यांनी त्यांच्या साइटवरून तुर्कीशी संबंधित चुकीची माहिती काढून टाकली नाही, तर त्यांच्यावर निर्बंध लादले जातील. देशात आक्षेपार्ह पोस्टसाठी आतापर्यंत १८ जणांना ताब्यात घेण्यात आले असून ५ जणांना अटक करण्यात आली आहे.

वर्ल्ड फूड प्रोग्रामने म्हटले आहे की सीरियातील लोकांना आठवडाभर पुरेल इतके अन्न आहे. तुर्कीमध्ये ८ हजारांहून अधिक लोकांना वाचवण्यात आले आहे. बचावकार्यासाठी ६० हजारांहून अधिक बचावकर्ते तैनात करण्यात आले आहेत.

**भारताने सुरू केले 'ऑपरेशन दोस्त'**

'ऑपरेशन दोस्त' अंतर्गत भारतही मदत पाठवत आहे. वास्तविक, 'मित्र' हा शब्द तुर्की आणि हिंदी भाषांमध्ये वापरला जातो, म्हणून या ऑपरेशनला मित्र असे नाव देण्यात आले आहे. बचाव कार्यासाठी एनडीआरएफच्या टीमसोबत गरूडा एरोस्पेस कंपनीचे ड्रोनही पाठवण्यात आले आहेत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी सांगितले की तुर्कीमध्ये भूकंपानंतर एक भारतीय नागरिक बेपत्ता आहे. तसेच १० भारतीय तुर्कस्तानच्या दुर्गम भागात अडकले आहेत. त्यांच्या सुटकेचे प्रयत्न सुरू आहेत.

**भूकंपामुळे तुर्की १० फूट पुढे सरकले**

भूकंपाचा केंद्रबिंदू तुर्किये होता. हे पाहता इथल्या टेक्टोनिक प्लेट्स १० फूट (३ मीटर) वर सरकल्याचं तज्ज्ञ सांगतात. वास्तविक, तुर्की ३ टेक्टोनिक प्लेट्सच्या मध्ये वसलेले आहे. या प्लेट्स म्हणजे अनाटोलियन टेक्टोनिक प्लेट, युरेशियन आणि अरेबियन प्लेट.

तज्ज्ञांच्या मते, ॲनाटोलियन टेक्टोनिक प्लेट आणि अरेबियन प्लेट एकमेकांपासून २२५ किलोमीटर दूर सरकल्या आहेत. त्यामुळे तुर्कस्तान आपल्या भौगोलिक ठिकाणापासून १० फूट सरकले आहे. इटलीचे भूकंपशास्त्रज्ञ डॉ. कार्लो डोग्लिओनी यांनी सांगितले की, टेक्टोनिक प्लेट्समधील या बदलामुळे तुर्की सीरियापेक्षा ५ ते ६ मीटर (सुमारे २० फूट) जास्त बुडाले असावे. ते म्हणाले- ही माहिती प्राथमिक आकडेवारीवरून मिळाली असली तरी. येत्या काही दिवसांत सॅटेलाइट इमेजमधून अचूक माहिती मिळणार आहे.

# शिंदे-फडणवीस जोडीचे अण्णांकडून कौतुक

## वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्र्यांना दिले आशीर्वाद आणि शुभेच्छा

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वाढदिवसानिमित्त दूरध्वनीद्वारे शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे चांगले काम करीत असल्याचा उल्लेख करीत अण्णांनी त्यांचे कौतुक केले.



शिंदे फडणवीस यांच्या निमित्ताने महाराष्ट्राला राज्यकर्त्यांची चांगली जोडी लाभली आहे. हे दोघेही उल्लेखनीय काम करीत आहेत. राज्यात तळागाळापासून परिवर्तनाची आवश्यकता होती. शिंदे फडणवीस त्यादृष्टीने चांगले काम करीत आहेत, असे अण्णांनी नमूद केले.

चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी आपला आशीर्वाद कायम आहे, असे सांगत अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्र्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या.

### त्र्यंबकेश्वर येथील शिवलिंगावर बर्फ जमा झाल्याचे प्रकरण

# पुजाऱ्यांवर जादूटोणा विरोधी कलम लावा, अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी

**नाशिक : वृत्तसंस्था**

त्र्यंबकेश्वर येथील शिवलिंगावर बर्फ जमा झाल्याचा बनाव करणाऱ्या पुजाऱ्यांवर त्र्यंबकेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र यामध्ये जादुटोणा विरोधी कलम पोलिसांनी लावले नसल्याने वाढीव कलम लावण्याची मागणी अंधश्रद्धा निर्मुलन समितीने जिल्हाधिकारी आणि त्र्यंबकेश्वर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरिक्षकांना निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत अंनिसने दिलेल्या निवेदनानुसार, त्र्यंबकेश्वर येथील शिवलिंगावर बर्फ जमा झाल्याची अफवा येथील पुजाऱ्यांनी पसरवली होती. याविरोधात अंनिसने हे षडयंत्र असल्याचा दावा केला होता. पुजाऱ्यांनी बाहेरून बर्फ आणून पिंडींवर ठेवल्याची कबूली पुजाऱ्यांनी पोलिसांत दिली होती. अंनिस चा दावा खरा ठरला होता.

**श्रद्धेशी खेळ केल्याचा आरोप**

पुजाऱ्यांनी भाविकांच्या श्रद्धांशी खेळ केल्याचा आरोप करत पुजाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्र्यंबकेश्वर पोलिस ठाण्यात संशयित पुजाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र यात जादूटोणाविरोधी कायद्या कलम दाखल नसल्याने अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जिल्हाधिकारी व पोलिस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर यांना निवेदन देत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**कडक कारवाई करण्याची मागणी**

सीसीटीव्ही पुरावे असतानाही हा गुन्हा दाखल होण्यासाठी सात महिन्यांचा कालावधी का लागला, याची सखोल चौकशी करावी तसेच संबंधित दोषींवरही कडक कारवाई करण्याची मागणी अंनिसचे सचिव डॉ. टी. आर. गोराणे, कार्यवाह,कृष्णा चांदगुडे व त्र्यंबकेश्वर शहर कार्याध्यक्ष,संजय हरळे यांनी केली आहे.

**काय होता प्रकार**

त्र्यंबकेश्वर मंदिरातील शिवलिंगावर बर्फाच्या थर जमा झाला. हा काहीतरी दैवी संकेत असून दैवी चमत्कार आहे असा दावा करणारा व्हिडिओ सोशल मिडियावर ३० जून रोजी व्हायरल झाला होता. याची खात्री करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने गंभीर दखल घेत प्रत्यक्ष मंदिरात जाऊन पाहणी केली असता या घटनेत मानवी हस्तक्षेपा शिवाय असल्याचे लक्षात आले. याविरोधात समितीने पोलिसात पुराव्यानिशी तक्रार दिली होती.

# रहिमतपूर शहरातील वडूज रस्त्याच्या कामाबद्दल नागरिकांमध्ये नाराजी

**रहिमतपूर : प्रतिनिधी**

अनेक वर्षापासून प्रलंबित असणारा रहिमतपूर वडूज रस्त्याच्या कामाला नुकतीच सुरुवात झाली आहे. यातील रहिमतपूर नगरपालिकेच्या विकास योजनेतील डी.पी. रोड तसेच रिंग रोडचा भाग असलेल्या मार्गाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे काम प्रस्तावित आहे. बऱ्याच काळापासून हे काम रेंगाळले असल्याने स्थानिक नागरिकांसोबत प्रवाशांना या रस्त्यावरील धुळी सह खड्ड्यांचा त्रास मुकाटपणे सहन करावा लागत आहे.

महाविकास आघाडी सरकार असताना मंजूर झालेल्या या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत सुरुवाती पासूनच प्रश्नचिन्ह व वाद निर्माण झाले आहेत. या कामाची मंजूर झालेली निविदा ही मुळ निवीदा रकमेपेक्षा कमी दराची असल्याने रस्त्याच्या गुणवत्तेचे नक्की काय होणार ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. रस्त्याचे काम होणार असल्याने मागील वर्षभरापासून या रस्त्यावर रस्त्यावरील खड्डे प्रशासनाने भरले नसल्याने अतिशय खराब रस्त्यावरूनचं नागरिकांना व विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागत आहे. या खराब रस्त्यामुळे संपूर्ण परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले असून याचा स्थानिक नागरिकांना मोठा त्रास होत आहे. असे असतानाही ठेकेदाराने या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले असून कमीत कमी खर्चात रस्ता बनवण्याचा ठेकेदारचा प्रयत्न नागरिकांना त्रासदायक ठरत आहे.

मागील पावसाळ्यात या मार्गावरील रहिमतपूर ते अंभेरी घाट या मार्गातचे निकृष्ट काम याच ठेकेदाराने केले आहे. डांबराचे तीनही लेअरचे काम पावसाळ्यात म्हणजेच जून महिन्यामध्ये गडबडीत पुर्ण केले व त्याचे दुष्परिणाम आता त्या रस्त्याच्या सुमार दर्जावरून लक्षात येत आहेत. खरे तर शासनाच्या नियमानुसार जून महिन्यामध्ये डांबराचे काम करण्यास बंदी असतानाही सर्व नियम पायदळी तुडवत संबंधीत ठेकेदाराने घाई मध्ये रस्त्याचे डांबरीकरणाचे सोपस्कार पूर्ण केले आहेत. मुळातच अनेक दशकांपासून या मार्गाकडे राजकारणी व संबंधीत विभागाचे दुर्लक्ष असल्याने हा रस्ता कायम खड्ड्यातच असल्याचा गत अनुभव असतानाच पुन्हा अशा खराब दर्जाच्या मार्गामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय व सामान्य जनतेच्या जीविताशी खेळण्याचा प्रकार ठेकेदार व प्रशासन मिळून संगनमताने केला असल्याची बाब दिसून येत आहे.

दरम्यान, सद्यस्थितीत प्रस्तावित असलेला गावठाण हद्दीतील चौपदरीकरणाचा रस्ता हा रस्ता नगरपालिकेच्या विकास योजनेतील रिंग रोडचा भाग असल्याने अप्रत्यक्षपणे रिंग रोड चे काम सुरू झाले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्याने त्याचे काम राज्य शासनामार्फत केले जात आहे. असे असले तरीही नगरपरिषद व पदाधिकाऱ्यांनी या रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कारण संबंधित ठेकेदाराने रस्त्याच्या दुतर्फा असलेली



झाडे अर्धवट तोडून रहदारीस अडथळा होईल असे इतस्तता टाकलेली दिसून येत आहेत.

कारण हा रस्ता शहरातील महत्त्वाच्या व सर्वाधिक वेगाने विकसित होत असलेल्या कलानगर व विजयनगर परिसरातून जात आहे. दरम्यान या प्रस्तावित कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधित ठेकेदार व संबंधित शासकीय कर्मचारी व अधिकारी वर्ग दुर्लक्ष करत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे.

वडूज रस्त्याच्या उत्तरेला शाळा कॉलेज व प्राथमिक शाळा असल्याने नागरिक, छोटी मुले व विद्यार्थ्यांची मोठी लगबग दिवसभर या मार्गावरून सुरू असते. या मार्गावरच विजयनगर, कलानगर व रोकडेश्वर गल्ली असा मोठ्या लोकसंख्येचा भाग या मार्गास लागून आहे. या मार्गावरच वडूज रस्त्यावरून नैऋत्य दिशेला गावात जाणारा १८ मीटर रुंदीचा मार्ग हा तीव्र उताराचा असल्याने या दोन्ही रस्त्याच्या जोड ठिकाणी सातत्याने अपघात होत आहेत. याच ठिकाणी रहिमतपूर नगरपालिकेच्या डीपी प्लॅन मधील औंध रस्त्याला जाऊन मिळणारा २४ मि. रूंदीचा रिंग रोड प्रस्तावित आहे व याच चौकात जुना अपशिंगे रस्ता व त्या मार्गावरील विजयनगरची वसाहत अशी गर्दीची रहदारी असणारा हा चौक आहे. याबाबत नवीन मार्ग रेखांकन करताना येथील अपघात प्रवणता व तेथील भौगोलिक रचना याचा अभ्यास न करता बिनडोकपणे रस्त्याचे नियोजन केल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे असून भविष्यातील अपघाती व धोकादायक ठिकाणाची निर्मिती होऊन नागरिकांचे जीवितास गंभीर धोका निर्माण करण्याचे पाप सार्वजनिक बांधकाम विभाग करत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच याबाबत पोलीस विभाग व रहिमतपूर नगरपालिकेने पुढाकार घेऊन सदर ठिकाणी होणारी अपघाती ठिकाणाची उत्पत्ती टाळावी यासाठी शासनाकडे मागणी करावी अशी नागरिक मागणी करत आहेत.

या मार्गावरच आदर्श विद्यालय प्राथमिक- माद्यमिक शाळा व सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय ज्युनिअर कॉलेज व माऊली एज्युकेशन प्रशाला व खेळाचे भव्य मैदान आहे. या मार्गावरून हजारो नागरिक पहाटे व संध्याकाळी जॉगिंगला जात असतात. यामुळे हा मार्ग रहदारीला व पादचाऱ्यांसाठी अपघात शून्य असावा अशी नागरिकांची माफक मागणी आहे.

याबाबत दक्ष नागरिकांनी संबंधीत विभागाकडे अनेक महिन्यापूर्वीच लेखी निवेदने देऊनही याबाबत संबंधित अधिकारी कोणतेही लक्ष देत नसल्याची खंत लोक बोलून दाखवत आहेत. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी किमान आता तरी जागे होऊन धोकादायक ठिकाणांची स्थानिकांसोबत समक्ष पाहणी करून त्यावर उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांच्याकडून होत आहे. त्यामुळे आगामी काळात नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊन बांधकाम विभाग कामाचा दर्जा व नियोजन सुधारणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २६४ कोटींचा 'टीडीएस' घोटाळा : अभिनेत्री कृती वर्मा सीबीआयच्या रडारवर

## गैरव्यवहाराच्या पैशातून मालमत्ता खरेदीचा आरोप

**मुंबई : वृत्तसंस्था**

तब्बल २६४ कोटी रुपयांच्या टीडीएस घोटाळ्यात अभिनेत्री कृती वर्माही सीबीआयच्या रडारवर आली आहे. 'सीबीआय'ने तिच्या खात्यात सापडलेले १.१८ कोटी रुपये गोठवले आहेत.

२०२१ मध्ये गुरुग्राम, (हरियाणा) येथे वर्मा यांच्या नावावर घोटाळ्याच्या पैशातून मालमत्ता खरेदी करण्यात आली होती. 'सीबीआय'चा तपास सुरू होताच ही मालमत्ता विकण्यात आली आणि सर्व पैसे अभिनेत्रीच्या बँक खात्यात जमा करण्यात आले, असा आरोप आहे.

'टीडीएस' घोटाळ्याप्रकरणी 'सीबीआय'ने लोणावळा, खंडाळा, कर्जत, पुणे आणि उडुपी येथील अनेक फ्लॅटसह मालमत्ता जप्त केल्या आहेत. त्यात अभिनेत्री कृती वर्माच्या नावावर असलेल्या संपत्तीचाही समावेश आहे. कृती वर्माने यापूर्वी जीएसटी इन्स्पेक्टर पदावर काम केले आहे. नंतर सरकारी नोकरी सोडून टीव्ही शोमध्ये काम करायला सुरुवात केली. कृती वर्माला एमटीव्ही रोडीज एक्स्ट्रीम आणि बिग बॉस सीझन-१२ पासून ओळख मिळाली. सुंदर कृतीच्या आयुष्यात सर्व काही ठीक चालले होते. मात्र, करोडो रुपयांच्या टीडीएस घोटाळ्यात तिचे नाव आल्यास तिच्या फिल्मी करिअरला



फटका बसण्याची शक्यता आहे.

अभिनेत्री कृती वर्मा मूळची दिल्लीची आहे. २020 च्या शेवटी एका 'डान्स शो' दरम्यान, तिची ओळख टीडीएस घोटाळ्यातील आरोपी भूषण पाटील याच्याशी झाली. तिच्या नृत्यावर आणि सौंदर्यावर मोहित झालेल्या पाटील यांने नंतर एक कोटी रुपये तिच्या बँक खात्यात ट्रान्सफर केले. या प्रकाराचा दावा अभिनेत्री कृतीने सीबीआयसमोर केला आहे. यासोबतच 'टीडीएस' घोटाळ्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

'सीबीआय'ने केलेल्या दाव्यानुसार टीडीएस घोटाळ्याचा 'मास्टरमाइंड' आयटी इन्स्पेक्टर तानाजी मंडल अधिकारी आहे. त्यानेच व्यापारी भूषण पाटील यांच्यासोबत मिळून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला. तो वरिष्ठांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून अस्सल आणि बोगस टीडीएस परतावा दावे मंजूर करत असे. त्यांनी नोव्हेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२० दरम्यान एकूण १२ बोगस टीडीएस दावे मंजूर केले.

जेव्हा एखादी कंपनी टीडीएस परताव्याचा दावा करत असे, तेव्हा अधिकारी पाटील यांच्या बनावट कंपनीचे नाव त्यात जोडायचे. आयटी यंत्रणेत हेराफेरी करून तो पाटील यांचे बँक खाते परतावा दाव्यात जोडत असे. एवढेच नाही तर ते पकडले जाऊ नये म्हणून पाटील यांचे बँक खाते नंतर आयटी यंत्रणेतून काढून टाकायचे.

# आमदार डॉ. प्रज्ञा सातवांची सुरक्षा वाढवली

**हिंगोली : प्रतिनिधी**

कळमनुरी तालुक्यातील कसबे धावंडा येथे आमदार डॉ. प्रज्ञा सातव यांच्या वरील हल्ल्याच्या घटनेनंतर पोलिस दलाने त्यांच्या सुरक्षेत वाढ केली. गुरुवारी (ता. ९) सकाळीच दोन पोलिस कर्मचारी त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात केले आहेत. तर दुसरीकडे आरोपी महेंद्र डोंगरदिवे याची न्यायालयाने तुरुंगात रवानगी केली आहे.

कसबे धावंडा येथे आमदार डॉ. सातव यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर आमदार डॉ. सातव यांनी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून आज पहाटे महेंद्र डोंगरदिवे या तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक पंढरीनाथ बोधनापोड, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले यांच्या पथकाने त्याला अटक केली. त्याला आज कळमनुरीच्या न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने त्याची तुरुंगात रवानगी केली आहे. दरम्यान, या घटनेनंतर पोलिस अधिक्षक जी. श्रीधर यांनी आमदार डॉ. सातव यांच्या सुरक्षेमध्ये तातडीने वाढ केली आहे. एक महिला पोलिस कर्मचाऱ्यासह दोन पोलिस कर्मचारी तैनात केले आहे.